महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ 20 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 236 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# आमचे सरकार शिवरायांच्या विचारांचे - मुख्यमंत्री

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

जुन्नर : रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचे राज्य सरकार असून या सरकारकडून शिवनेरी किल्ल्यासह इतर किल्ल्यांच्या संवर्धनाला निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवनेरी किल्ल्यावर शिवभक्तांना संबोधताना दिली. राज्यामधील किल्ले व किल्ल्यांच्या परिसरामध्ये अतिक्रमण होत असून हे अतिक्रमण राज्य सरकार होऊ देणार नाही व ज्यांनी अतिक्रमण केले ते सुद्धा तात्काळ काढून टाकले जाईल असेही यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. शिवाजी महाराजांची 395 वी जयंती बुधवारी (दि. 19) किल्ले शिवनेरी येथे पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सांस्कृतिकमंत्री आशिष शेलार, आमदार शरद सोनवणे माजी आमदार अतुल बेनके, बापूसाहेब पठारे, विघ्नहर'चे अध्यक्ष सत्यशील शेरकर, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पोलीस अधीक्षक डॉ. पंकज देशमुख जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मिलिंद



बारभाई, भाजप नेते आशाताई बुचके आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शिवनेरी किल्ले व परिसरात विकासासंदर्भामध्ये आमदार शरद सोनवणे यांनी केलेल्या

## शिवनेरीवर संपन्न झाला शिवरायांचा ३९५ वा जयंती सोहळा

तेरा ही मागण्या पूर्ण करण्यासाठी हे सरकार कटीबद्ध आहे. शिवनेरीवर आल्यावर इथली माती कपाळाला लावल्यावर स्वराज्याची स्फूर्ती मिळते. हीच स्फूर्ती उराशी बाळगून आम्ही राज्यकारभार करीत आहोत.

शिवाजी महाराज हे जगाचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी अठरापगड जातीला सोबत घेऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. या गडकिल्ल्यांमुळे आम्हाला ऊर्जा मिळते. आणि म्हणूनच खऱ्या अर्थान शिवाजी महाराजांच्या विचारांचे रयतेचे राज्य करण्याचा आमचा नेहमी प्रयत्न राहतो; असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले




# जिल्ह्यातील आरोग्यमित्र संपावर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महात्मा फुले जन आरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत कार्यरत असलेल्या आरोग्यमित्रांच्या मागण्याकडे सकरार दुर्लक्ष करत असल्यामुळे महाराष्ट्रातील सर्व आरोग्य मित्रांनी बेमुदत संप पुकारला आहे. ठाणे जिल्ह्यातील आरोग्य मित्र देखील या संपात सहभागी झाले असून ठाणे शासकीय विश्राम गृहाबाहेर ते आंदोलनास बसले आहेत. राज्यात राबविण्यात येत असलेल्या महात्मा फुले जन आरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन स्वरुपात भरण्यासाठी आरोग्य मित्र या पदासाठी भरती करण्यात आली होती. ज्या रुग्णालयात या योजना राबविल्या जातात त्या रुग्णालयात हे आरोग्य मित्र काम करत होते.

रुग्णाचा आलेला अर्ज आणि कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन पद्धतीने त्यांचा अर्ज संकेतस्थळावर समाविष्ट करण्याचे काम हे आरोग्यमित्र करतात. या आरोग्य मित्रांनी किमान वेतन आणि वार्षिक वेतनवाढ, आरोग्यमित्रांना ठरावीक संख्येने रजा मिळाव्यात, कायमस्वरूपी नोकरीचा दर्जा मिळावा आणि अन्य कामाच्या जबाबदाऱ्यांबाबत स्पष्ट धोरण आखावे अशा मागण्या सरकारकडे केल्या होत्या. आरोग्यमित्रांनी या मागण्यांसाठी १२ फेब्रुवारीपासून संपावर जाण्याचा इशारा दिला होता. परंतू, राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी मध्यस्थी करत १२ फेब्रुवारीला बैठक आयोजित केली. या बैठकीस डेप्युटी सीईओ विनोद बोंद्रे, तसेच सहाय्यक संस्था (टीपीए) पदाधिकारी आणि महाराष्ट्र आरोग्य मित्र कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष डॉ. डी.एल.कराड यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.




# रेखा गुप्ता दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री

## भाजपकडून महिला नेत्याला संधी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : देशाच्या राजधानी कमळ खुलल्यानंतर गेल्या 10 दिवसांपासून दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाबाबत (Chief minister) चर्चा सुरू होती. त्यामुळे, दिल्लीतील मुख्यमंत्रीपदाची माळ नेमकं कोणाच्या गळ्यात पडणार याकडे देशाचे लक्ष लागले होते. 10 वर्षे अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीचे मुख्यमंत्रीपद भूषवले. तर, निवडणुकांच्या दोन महिने अगोदर आपकडून आतिशी यांना मुख्यमंत्री पदावर संधी देण्यात आली होती. त्यामुळे, भाजपकडून दिल्लीसाठी (Delhi) कोणता चेहरा पुढे येणार यावर चर्चा सुरू असतानाच आज भाजपच्या बैठकीत दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालंय. रेखा गुप्ता (Rekha gupta) यांनी भाजप आमदारांचा गटनेता म्हणून घोषित करण्यात आले. तसेच, दिल्लीच्या भाजप प्रदेशाध्यक्षांनी रेखा गुप्ता ह्याच उद्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील, असेही जाहीर केले. तर, परवेश शर्मा हे दिल्लीचे उपमुख्यमंत्री असणार आहेत. भाजपकडून दिल्लीच्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि विधानसभा अध्यक्षांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. त्यानुसार, रेखा गुप्ता मुख्यमंत्री, परवेश शर्मा उपमुख्यमंत्री आणि विजेंद्र गुप्ता विधानसभेचे स्पीकर असणार आहेत. दिल्लीसाठी महिला नेतृत्वाला संधी देत भाजपने लाडक्या बहिणींची मनं जिंकली आहेत. दिल्लीतील रामलीला मैदानावर भाजपच्या आणि दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी सोहळा संपन्न होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींसह दिग्गज नेते या शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्रातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री देखील या सोहळयासाठी आजच दिल्लीला जाणार असल्याची माहितीआहे.

# शहापूरातील वन्यप्राण्यांचे अधिवास धोक्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर । शहापूर तालुक्यातील सह्याद्री पर्वतरांगांमधील बहुतांश जंगल हे समृद्धी महामार्ग आणि विविध धरण आणि रस्ते प्रकल्पांसाठी भुईसपाट झाले आहेत. काही वर्षांपासून प्रकल्पांसाठी प्रचंड जंगल तोड झाल्याने येथील दाट, हिरवीगर्द जंगल ही नामशेष झाली आहेत. परिणामी वन्यजीवांचे अधिवास आता धोक्यात सापडले आहेत. दुसरीकडे अन्न पाण्याच्या शोधात मोठ्या प्रमाणावर वन्यजीव जंगल सोडून आता जंगला शेजारील गाव वस्त्यांमध्ये शिरकाव करत आहेत. येथील जंगलातील नीलगायींचे कळप गाव वस्ती लगत माळरानावर स्थलांतरित झालेले दिसत आहेत. हे वन्यजीव नीलगायींचे कळप शेतकऱ्यांच्या रोज नजरेस पडत आहेत. शिकार आणि पाण्याच्या शोधात भटकंती करत असलेल्या नीलगायींचे कळप हे शेतकऱ्यांच्या रब्बी हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान करताना दिसत आहेत. या नीलगायी या भाजीपाला, कडधान्य फस्त करीत आहेत. नीलगायींच्या या वाढत्या उपद्रवामुळे शेतकरी कमालीचे चिंतेत सापडले आहेत.

# आदिवासींच्या जमिनीवर अतिक्रमण

## अंबरनाथ तहसीलदारांच्या आश्वासनानंतर उपोषण मागे?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ ता. १९ (वार्ताहर): अंबरनाथः मालकी असलेल्या जागेवर समाजकंटकांकडून अतिक्रमण करून त्या ठिकाणी चाळींचे बांधकाम केल्यामुळे सुनील वाघे या आदिवासी बांधवाने कुटुंबासहित न्याय मिळवण्यासाठी अंबरनाथ तहसील कार्यालयाबाहेर उपोषणाचा मार्ग पत्करला आहे. यावेळी मागण्यांचे निवेदन देखील त्यांनी तहसीलदारांना दिले. नायब तहसिलदारांच्या चौकशीनंतर



कार्यवाही करण्याच्या आश्वासनंतर सायंकाळी उपोषण मागे घेण्यात आले. शहराच्या पश्चिमेला असलेल्या मोरीवली येथील गट नं. ४७ मध्ये अंदाजे २२ गुंठे जागा सुनील वाघे व त्यांच्या कुटुंबियांच्या नावे आहे. त्याचा सात-बारा देखील त्यांच्या नावे असल्याचे सुनील वाघे यांनी सांगितले. मात्र आपल्या अज्ञानाचा व अशिक्षितपणाचा फायदा घेऊन काही समाजकंटकांनी संबंधित जागेवर अतिक्रमण केले असल्याने भूमिहीन झाले असून जागेवरील अतिक्रमण हटवण्यासाठी तहसीलदार कार्यालयाबाहेर उपोषण सुरू केले आहे. ठोस कारवाईचे आश्वासन मिळत नाही तोपर्यंत उपोषण सुरूच ठेवणार असल्याचे सुनील वाघे यांनी सांगितले. नायब तहसीलदार किरण पाटील यांनी उपोषणकर्ते सुनील वाघ यांना चौकशीचे लेखी पत्र दिल्यानंतर यांनी उपोषण तूर्त मागे घेतल्याचे वाघे यांनी सांगितले. या प्रकरणी सविस्तर चौकशी करून नियमानुसार काय कारवाई करता येईल, याबाबत संबंधितांना सुचना दिल्या आहेत, असे नायब तहसीलदार किरण पाटील यांनी सांगितले. दरम्यान, तहसीलदार अमित पुरी यांच्या लेखी आश्वासनानंतर हे उपोषण रात्री उशिरा स्थगित केले आहे.

# मंत्रिमंडळ बैठकीचा अजेंडा लीक

## मुख्यमंत्र्यांकडून कारवाईचा दखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मंगळवारच्या मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंत्र्यांवर रागावले अशी माहिती आहे. मंत्रिमंडळ बैठकीच्या आधीच माध्यमांमध्ये अजेंडा छापून येत असल्याने फडणवीसांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणार असं स्पष्ट सांगितलं. थोडक्यात काय तर मंत्रिमंडळ बैठकीचा अजेंडा लिक करणाऱ्यांची खैर नाही असा गंभीर इशाराच मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. या सगळयाला कारणही तसंच होतं. मंगळवारी पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये डान्सबार संदर्भात चर्चा होणार होती. मात्र बैठकीच्या आधीच एबीपी माझानं ही बातमी दाखवली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस संतप्त झाले. विरोधकांनीही यावरुन आपले हात धुवून घेतले.

### अजेंडा लीक करणाऱ्यावर कारवाई करणार

महायुती सरकारमधील नेत्यांनी यावर सावध प्रतिक्रिया दिली आहे. मंत्री भरत गोगावले म्हणाले की, मंत्रिमंडळाचा अजेंडा कोणी फोडला याची चौकशी सुरू आहे. मंत्री आणि त्याच्या पीएसनीही हा अजेंडा गुप्त ठेवायचा असतो. ज्यांनी हा अजेंडा फोडला आहे तो कोणीही असो, त्याच्यावर कारवाई होईल. पूर्वी निर्णय लीक होत होते. या पुढच्या काळात तशा प्रकारची गुप्तता पाळली जावी. कारण गुप्तता पाळण्याची आपण शपथ घेतो. ती शपथ तंतोतंत खरी ठरवण्याची फडणवीस यांची इच्छा आहे आणि त्या धर्तीवर काम सुरू आहे असं मंत्री निलेश राणे यांनी म्हटलंय. मोदी सरकार असो की फडणवीस सरकार, गुप्तता हाच यांचा यूएसपी राहिला आहे. केंद्र असो की राज्य गेली 10 वर्षे सरकारकडून सर्व गोष्टींमध्ये अतिशय गुप्तता पाळली जात आहे. अशा पद्धतीने बातम्या लीक व्हायची सवय नसल्याने फडणवीसांचा चांगलाच संताप झाल्याचं दिसून आलं.

# कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील जप्त मालमत्तांचा होणार फेरलिलाव?






दै. ठाणे जीवनदीप वार्ता


कल्याण : मालमत्ता कर उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत आहे. मालमत्ता कर थकीत ठेवणा-या मिळकतधारकांना कराचा भरणा करणेबाबत वारंवार नोटीस पाठवनूही त्यास प्रतिसाद मिळत नाही. याची गंभीर दखल घेवून थकीत रक्कम वसूल करण्यासाठी महानगरपालिकेने १/अ, २/ब व ३/क प्रभागातंर्गत १५ मालमत्ता जप्त केल्या असून, त्याचा लिलाव १७ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात आला. सदर लिलावास प्रतिसाद मिळालेला नसल्याने, या मिळकतींचा फेरलिलाव काढण्यात येणार आहे.

नागरिकांनी मालमत्ता कराचा भरणा वेळेत व नियमित करावा यासाठी महानगरपालिकेकडून वेळोवेळी आवाहन केले जाते. मात्र,अनेक मालमत्ताधारकांकडून मालमत्ता कर थकवला जातो. मालमत्ता जप्तीची कारवाई करुनही थकबाकी न भरता नोटीसला प्रतिसादही दिला जात नाही. अशा,थकबाकीदारांच्या जप्त केलेल्या मालमत्तांचा लिलाव करण्याची कारवाई सुरु आहे. थकीत मालमत्ता कराबाबत सातत्याने जप्ती/अटकावणी व लिलावाची कारवाई महानगर पालिकेतर्फे केली जाते. तरी, अशी कठोर कारवाई टाळण्याकरीता नागरीकांनी मालमत्ता कराचा भरणा त्वरीत करुन महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन कर विभागामार्फत करण्यात येत आहे.

# भिवंडीत परफ्यूम गोदामाला भीषण आग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : मुंबई नाशिक महामार्गालगच्या येवई भागात एका गोदामाला भीषण आग लागल्याची घटना बुधवारी पहाटे उघडकीस आली. या आगीत गोदामातील सर्व साहित्य जळून खाक झाले आहे. या घटनेत कोणीही जखमी झाले नसले तरी संपूर्ण आग शमविण्यासाठी आणखी दोन दिवस लागणार असल्याचे भिवंडी महापालिकेच्या अग्नीशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. भिवंडीत मंगळवारी सायंकाळी अशाचप्रकारे एका शिववणी वर्गाला आग लागली होती. त्यामुळे शहरात अग्नीसत्र



सुरूच असल्याचे दिसून येत आहे.

भिवंडी येथील येवई गाव परिसरात आर. के. लॉजिस्टीक परिसरात तीन कंपन्यांचे एक गोदाम आहे. प्राथमिक माहितीनुसार, या गोदामांमध्ये सौंदर्य प्रसाधनांचा साठा असतो. बुधवारी पहाटे ४.३० वाजताच्या सुमारास या गोदामाला अचानक भीषण आग लागली. अवघ्या काही क्षणात आगीने रौद्ररुप धारण केले. धुराचे लोट हवेत पसरले होते. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले. घटनेची माहिती भिवंडी महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांना मिळाल्यानंतर भिवंडी अग्निशमन दलाचे पथके घटनास्थळी दाखल झाले. ही आग इतकी भीषण होती की, आगीवर नियंत्रण मिळविणे पथकाला शक्य होत नव्हते. या अगीमध्ये कंपनीतील लाखो रुपयांचा साठा आगीत भस्मसात झाला. पथकाला सात तासानंतर येथील आगीवर नियंत्रण मिळविणे शक्य झाले. परंतु आग बुधवारी सायंकाळनंतरही धुमसत होती. त्यामुळे ही आग पूर्णपणे विजविण्यासाठी आणखी दोन दिवस लागू शकतात अशी माहिती भिवंडी महापालिकेच्या अग्निशमन दलाचे मुख्य अग्निशमन अधिकारी राजेश पवार यांनी दिली.

## आगीचे सत्र सुरुच

दरम्यान, मंगळवारी देखील भिवंडी येथील ठाणगे आळी परिसरातील एका शिववणी वर्गाला आग लागली होती. ठाणगे आळी येथील ठक्कर कॉम्प्लेक्समध्ये विनटॉप क्लासेस नावाने शिकवणी आहे. परीक्षा सुरू असल्याने विद्यार्थी शिकवणीच्या दुसऱ्या मजल्यावरील वर्गात अभ्यास करत होते. मंगळवारी सायंकाळी अचानक येथील वातानुकूलीत यंत्रणेमधून धूर येऊ लागला. त्यामुळे खबरदारी घेत शिकवणीतील ४० विद्यार्थ्यांना तळमजल्यावर आणण्यात आले. या आगीची झळ हळूहळू शिकवणीच्या तिसऱ्या मजल्यापर्यंत पसरली. दरम्यान अग्निशमन दलाची दोन वाहने घटनास्थळी आले आणि त्यांनी आगीवर नियंत्रण मिळविले. यावेळी टोरेंट पॉवर कंपनीच्या पथकाने घटनास्थळी येऊन आजूबाजूचा वीजप्रवाह खंडित केला. त्यामुळे आगीवर नियंत्रण मिळविण्यास व्यत्यय आला नाही. परंतु या आगीमध्ये विनटॉप क्लासेस या शिकवणीच्या मालमत्तेचे नुकसान झाले.या घटनांमुळे भिवंडी शहरात आगीचे सत्र सुरूच असल्याचे चित्र आहे

# गीतासार



अर्जुन उवाच ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन । तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव ॥ ३-१ ॥

अर्जुन म्हणाला, हे जनार्दन श्रीकृष्णा, जर तुम्हाला कर्माहून ज्ञान श्रेष्ठ वाटते, तर मग हे केशवा (श्रीकृष्णा), मला भयंकर कर्म करण्यास का प्रवृत्त करीत आहात? ॥ ३-१ ॥

व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे । तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम् ॥ ३-२ ॥

तुम्ही मिश्रितशा भाषणाने माझ्या बुद्धीला जणू मोहित करीत आहात. म्हणून अशी एकच गोष्ट निश्चित करून मला सांगा की ज्यामुळे माझे कल्याण होईल. ॥ ३-२ ॥


श्रीभगवानुवाच लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ । ज्ञानयोगेन साङ्ख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ॥ ३-३ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, हे निष्पापा, या जगात दोन प्रकारची निष्ठा माझ्याकडून पूर्वी सांगितली गेली आहे. त्यातील सांख्ययोग्यांची निष्ठा ज्ञानयोगाने आणि योग्यांची निष्ठा कर्मयोगाने होते. ॥ ३-३ ॥

न कर्मणामनारम्भान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते । न च संन्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति ॥ ३-४ ॥

मनुष्य कर्मे केल्याशिवाय निष्कर्मतेला म्हणजेच योगनिष्ठेला प्राप्त होत नाही आणि फक्त कर्मांचा त्याग केल्याने सिद्धीला म्हणजेच सांख्यनिष्ठेला प्राप्त होत नाही. ॥ ३-४ ॥

# सकारात्मक विचाराने परीक्षा द्या!



फेब्रुवारी मार्च महिना म्हटलं की परीक्षांचा हंगाम. दरवर्षी याच दोन महिन्यात परीक्षा होतात. दहावी बारावी या बोर्डाच्या परीक्षाही याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय यासारख्या स्पर्धा परीक्षाही याच काळात होतात. इयत्ता ५ वि आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षा नुकत्याच पार पडल्या. दहावीची बोर्ड परीक्षा उद्यापासून म्हणजे २१ फेब्रुवारी पासून सुरू होत असून ती १७ मार्च पर्यंत असणार आहे. बारावीची परीक्षाही ११ फेब्रुवारी रोजी सुरू झाली असून ती ११ मार्च पर्यंत चालणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतो. विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात म्हणूनच या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनात अतिशय महत्वाच्या असतात. दहावी - बारावीची बोर्ड परीक्षा म्हणजे विद्यार्थी आणि पालकांसाठी कमालीचे टेन्शन. करियरच्या दृष्टीने आणि पुढील अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी बोर्ड परीक्षेच्या गुणांना खूप महत्व असते. त्यामुळे विद्यार्थी वर्षभर भरपूर अभ्यास करत असतात. पण प्रत्यक्ष जेंव्हा परीक्षा जवळ येते तेंव्हा मात्र विद्यार्थ्यांचे टेन्शन वाढते. ते साहजिकच असले तरी या काळात विद्यार्थ्यांनी टेन्शन फ्री राहणे महत्वाचे आहे कारण नकारात्मक विचार घेऊन जर विद्यार्थी परीक्षेला गेला तर त्याचा विपरीत परिणाम होऊन वर्षभर केलेल्या मेहनतीवर पाणी पडू शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत प्रसन्न रहावे. सतत अभ्यास करण्याऐवजी मध्येमध्ये ब्रेक घेऊन थोडा वेळ टीव्ही पाहणे, संगीत ऐकणे, लहान मुलांशी खेळणे, बाहेर फिरून येणे, मित्रांशी अभ्यासाव्यतिरिक्त इतरही विषयांशी चर्चा करणे, गप्पा मारणे, चित्र काढणे, आवडती पुस्तके वाचणे अशा गोष्टी कराव्यात. रात्री जागरण करणे टाळावे. विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत मोबाईलपासून दूरच राहावे. वेळेवर झोपून वेळेवर उठावे. अभ्यासाचा खूप ताण आल्यास विश्रांती घ्यावी. या काळात शक्यतो बाहेर खाणेटाळावे. घरी बनवलेले जेवण वेळेवर करावे. पालकांनीही याकाळात सकारात्मक राहावे. आपल्या पाल्यांवर अभ्यासासाठी दबाव आणू नये. त्याला सतत परीक्षेची आठवण करून देऊ नये. त्याच्याशी हसून खेळून प्रेमाणे वागावे. पालकांनी स्वतःही परीक्षेचे टेन्शन घेऊ नये आणि मुलांनाही देऊ नये. जर विद्यार्थी परिक्षेचे टेन्शन न घेता सकारात्मक विचार घेऊन परीक्षेला गेला तर यश निश्चित मिळेल. दहावी बारावीच्या परीक्षा आयुष्यातील महत्वाचा टप्पा असला तरी शेवटचा टप्पा नाही त्यामुळे टेन्शन फ्री राहा. मन शांत ठेवून प्रश्नपत्रिका सोडवा. यश नक्की मिळेल. सर्व विद्यार्थी मित्रांना या बोर्ड परीक्षांसाठी मनापासून शुभेच्छा! ऑल दि बेस्ट.....!!

- श्याम ठाणेदार ,दौंड जिल्हा पुणे

# कल्याण डोंबिवली महापालिकेत
# शिवजयंती उत्साहात साजरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र्य सगळयांसाठीच प्रेरणादायी असून, शिवजयंती दिनी संपन्न होणा-या कार्यक्रमांमुळे मुलांना, विद्यार्थ्यांना आपली तत्वे, मुल्ये आणि गौरवशाली वारशाची ओळख होईल, असे प्रतिपादन कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी आज केले.



> शिवजयंती दिनी संपन्न होणा-या कार्यक्रमांमुळे मुलांना, विद्यार्थ्यांना आपली तत्वे, मुल्ये आणि गौरवशाली वारशाची ओळख होईल
> – केडीएमसी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून, आज किल्ले दुर्गाडी समोरील नॅशनल ऊर्दु हायस्कुल पासून भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी बोलताना महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी हे प्रतिपादन केले. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, शहर अभियंता अनिता परदेशी, उपआयुक्त वंदना गुळवे, स्वाती देशपांडे, अतुल पाटील, संजय जाधव, अवधुत तावडे, रमेश मिसाळ, बिर्ला महाविद्यालयाचे संचालक डॉ.नरेशचंद्र, स्वच्छ भारत अभियानाचे महापालिकेचे ब्रँड अँबेसिडर डॉ.प्रशांत पाटील, अपंग विकास महासंघाचे अध्यक्ष अशोक भोईर, महापालिका सचिव किशोर शेळके, कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे, प्रशांत भागवत, योगेंद्र राठोड, शैलेश कुळकर्णी, मनोज सांगळे, वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ दीपा शुक्ला, शिक्षणाधिकारी विजय सरकटे तसेच इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग व विद्यार्थी आणि शिक्षक वर्ग बहुसंख्येने उपस्थित होता.

आजच्या शिवजयंती दिनाचा प्रारंभ शालेय विद्यार्थी, शिक्षक, महापालिका अधिकारी व कर्मचारी आरएसपी शिक्षक अधिकारी ,स्काऊट गाईड विद्यार्थी,एनसीसी, एनएसएस विद्यार्थी यांच्या भव्य रॅलीने झाला. सकाळच्या शितल वातावरणात छत्रपती शिवाजी महाराज, मावळे यांच्या वेशभुषेत तसेच पारंपारिक पोषाखात रॅलीमध्ये सहभागी झालेल्या बालचमुने, सर्व पांथस्थांचे लक्ष वेधून घेतले होते. सदर रॅलीची सांगता लाल चौकी - सहजानंद चौक - छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे प्र.के.आचार्य अत्रे रंगमंदिरात झाली. यावेळी आमदार सुलभा गायकवाड आणि महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

तद्नंतर प्र.के.आचार्य अत्रे रंगमंदिरात महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांनी शिवरायांविषयी बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यासमयी आमदार सुलभा गायकवाड, राष्ट्रवादीचे नेते प्रमोद हिंदूराव व इतर मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते.

"छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वसामान्यांना न्याय मिळून दिला, त्यांना माझा मानाचा मुजरा आहे" असे सांगत आमदार सुलभा गायकवाड यांनी विद्यार्थी वर्गास शिवजयंती निमित्त शुभेच्छा दिल्या.

दुर्गाडी खाडी किनारी छत्रपती शिवाजी महाराजांनी पहिले नौदल आरमाराची स्थापना केली होती. ही आठवण जतन करण्यासाठी महापालिकेमार्फत सदर ठिकाणी नौदल संग्रालय उभारण्यात येत असून, सदर संग्रालय नागरिकांसाठी लवकरच खुले करण्यात येईल, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी यावेळी दिली.

डोंबिवलीतही घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त अतुल पाटील अवधूत तावडे यांनी डोंबिवली (पूर्व) मानपाडा रोड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण केला. यावेळी कार्यकारी अभियंता मनोज सांगळे ,फ व ग प्रभागाचे सहा.आयुक्त अनुक्रम हेमा मुंबरकर, संजयकुमार कुमावत तसेच इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# प्लास्टिकचा अतिवापर रोखण्याचे उल्हासनगर मनपा आयुक्तांसमोर आव्हान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

उल्हासनगर : राज्य सरकारचे प्लास्टिक पिशव्यां वर कठोर निर्बंध असतानांही उल्हासनगरात मात्र प्लास्टिक पिशव्या आणि इतर प्लास्टिक साहित्यांचा बेछूटपणे वापर होतांना दिसतोय. एकीकडे, मनपा पर्यावरण रक्षणाच्या विविध मोहिमा राबवतेय. तर दुसरीकडे मात्र उघडपणे प्लास्टिक विक्रीस अभय देवुन पर्यावरणाचा र्हास करतांना दिसत आहे . यानिमित्ताने अधिकार्यांचा कारवाईचा हा फार्स समोर येतोय. कारवाईची तीळ मात्र भीती नसलेल्या या बेकायदेशीर प्लास्टिक विक्रेत्यांना मुभा देणारे मनपाचे ते अधिकारी व भाजपाचे राजकीय दलाल नेते यांना आयुक्त आवर घालतील का, ही उत्सुकता शहरवासीयांना लागलीय.

उल्हासनगर मधील गजानन मार्केट, ४ नंबर मार्केट , खेमानी , नेहरू चौक, कैंप नंबर ५ या ठिकाणी उल्हासनगर कल्याण कर्जत कसाऱ्या पासूनचे व्यापारी प्लास्टिकच्या पिशव्या विकत घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात येतात. शहरातील कचऱ्यामध्ये ५० % पेक्षा अधिक प्लास्टिक कचऱ्याचा समावेश आढळतो. यामुळे शहरात वाढणाऱ्या जलप्रदूषण, तुंबणार्या गटारी, आणि प्राण्यांवर होणारे अपायकारक परिणाम यामुळे पर्यावरण प्रेमी चिंता व्यक्त करताहेत.

प्लास्टिक हे पुनरुत्पादीत न होणार पदार्थ . तो जमिनीत विरायला शेकडो वर्षे लागतात. पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यास अडथळा ठरतो. पशु व समुद्री



जिवांना प्राणघातक ठरतात. अशा प्लास्टिक विक्रेत्यांना ५ ते २५ हजारांचा दंड, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व मनपाकडून वसुली करण्याची तरतूद आहे. मात्र, उल्हासनगरात क्वचितच यावर कारवाई झालेली दिसते. उल्हासनगर महानगरपालिकेचा आरोग्य विभाग याबाबत उदासीन दिसत आहे.तर लाखो रुपये खर्च करून तयार केलेल ग्रीन मार्शल पथकही कुचकामी ठरलंय. अशा प्लास्टिक विक्रेत्यांना राजकीय खुलेआम अभय देणार्यांचे आयुक्त कठोर कारवाई करुन प्लास्टिक मुक्त शहर करतील का याकडे शहरवासीयांचे लक्ष लागून राहिले आहे..

**प्लास्टिक विक्रीला अभय देणारा तो भाजपाचा नेता कोण ?**

उल्हासनगरात अनधिकृत बांधकामे असो की बेकायदेशीरपणे प्लास्टिक विक्री अशा कृत्यांना पाठबळ देणारा आश्रयदाता तो भाजपाचा नेता आहे हे नागरिकांना पडलेलं एक कोडं आहे. जो अनेकदा प्लास्टिक विक्री वर महानगरपालिकेच्या किंवा प्रदूषण महामंडळाच्या कारवाया झाल्यास भाजपाच्या वरिष्ठ नेते व मंत्री यांच्याकडून फोन करवुन अशा कारवायांना दडपण्याचा प्रयत्न करतो. त्याकरिता तो या प्लास्टिक विक्रेते आणि बांधकाम धारकांकडून मोठ्या रकमा उकळतो. वेळप्रसंगी व्यापार्यांचे, आंदोलन, बंद पुकारण्याच्या धमक्याही देतो. मात्र त्या भाजपाच्या नेत्यावर आणि त्याच्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यास मनपाचे अधिकारी धजावत नाहीत. आपले राजकीय वजन वापरून अशा समाज विघातक प्रवृत्तींना प्रोत्साहन देणारा हा भाजपाचा नेता कोण ? हे लवकरच प्रकाशात यायला हवं .

> उल्हासनगर मधील निर्बंधीत प्लास्टिक निर्माते आणि विक्रेत्यांवर आमची करडी नजर आहे. नुकत्याच आम्ही ५०० किलो प्लास्टिक जप्त करून सर्वसाधारण पर्यंत ५०,००० पेक्षा अधिक दंड वसुली केली आहे. तरी देखील अशा बेकायदेशीरपणे प्लास्टिकच्या पिशव्या आणि इतर साहित्य विकणाऱ्यांची माहिती नागरिकांनी सतर्कपणे प्रदूषण मंडळास द्यावी आम्ही जरूर कारवाई करू." - जयंत कदम ( निरिक्षक, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ)

# मामा-भांजे डोंगराच्या आगीची चौकशी करा

ठाणे : संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील मामा-भांजे डोंगरावर लागलेल्या आगीबाबत वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रार करून विशेष चौकशी करावी, अशी मागणी सकल हिंदु समाज संघटनेच्या वतीने विजय त्रिपाठी यांनी केली आहे. तसेच अनधिकृत मजार, गाळे, कब्रस्तानांवर सुद्धा कारवाई व्हावी अशी आग्रही मागणी विजय त्रिपाठी यांनी केली आहे. ठाणे महापालिकेने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील मामा-भांजे डोंगरावर मोठ्या प्रमाणात झाडांची लागवड केली होती. तसेच ही जागा राष्ट्रीय उद्यान देखील आहे. या उद्यानात असलेल्या निसर्गसंपत्तीचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण हे उद्यान ठाणे शहराचा एक अनमोल ठेवा आहे. तथापि, काही दिवसांपूर्वी या डोंगरावर भीषण आग लागली असून, या आगीत शेकडो झाडे जळून खाक झाली आहेत. या घटनेमुळे वनसंपदा मोठ्या प्रमाणात उद्ध्वस्त झाली आहे. त्यामुळे पर्यावरणीय संतुलनावर गंभीर परिणाम झाले असल्याची बाव विजय त्रिपाठी यांनी निवेदनात निदर्शनास आणून दिली. या परिसरात भारताचे एअर फोर्स स्टेशन आहे. हा भाग अत्यंत संवेदशनशील आहे. एअर फोर्स स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी या परिसराचा दहशतवादी करवायांसाठी वापर केला जाण्याची माहिती दिली आहे. चाढता अनधिकृत वसाहतीचा प्रभाव आणि नशा करणाऱ्या लोकांची उपस्थिती चिंतेचा विषय बनली आहे. अनेक वेळा या परिसरात अनधिकृत बांधकामे आणि घुसखोरीच्या घटनांची नोंद झाली आहे. ज्यामुळे राष्ट्रीय सुरक्षा आणि पर्यावरणीय स्थिरता धोक्यात आलेली आहे. आग लागण्याच्या या घटनेमुळे, या परिसरात असलेल्या वनस्पती आणि जीवसृष्टीवर गंभीर परिणाम झाला आहे, जो आपल्या निसर्गसंपत्तीच्या संरक्षणासाठी अत्यंत चिंताजनक आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या संरक्षित क्षेत्रात अनधिकृत बांधकामे आणि वसाहतींचा वाढता प्रभाव यामुळे स्थानिक वन्यजीवांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. या परिसरात अनधिकृतपणे राहणाऱ्या लोकांच्या उपस्थितीमुळे स्थानिक सुरक्षा यंत्रणांसमोरही आव्हान निर्माण झाले आहे.

# तरुणांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास ही आजच्या काळाची गरज – डॉ.आनंदराव सूर्यवंशी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

कल्याण : रोटरी क्लब ऑफ कल्याण तर्फे दिनांक 13 फेब्रुवारी रोजी रोटरी सभागृह सार्वजनिक वाचनालय, कल्याण येथे डॉ.आनंदराव सूर्यवंशी, (माजी मनपा मुंबई शिक्षणाधिकारी) यांचे व्यक्तिमत्व विकास या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते .सर्वप्रथम रोटरी क्लब कल्याण चे अध्यक्ष श्री पराग कापसे यांनी सदर कार्यक्रमाचे प्रास्तावित केले . "तरुणांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास ही आजच्या काळाची नितांत गरज आहे "असे उद्गार सदर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ . आनंदराव सूर्यवंशी





यांनी व्यक्त केले . ते पुढे म्हणाले की आर्टस ,सायन्स ,कॉमर्स , ह्युमॅनिटीज् , फाईन आर्टस् अशा विविध शाखेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास कसा करता येईल यासंदर्भात त्यांनी आत्मपरिक्षण करण्याची नितांत आवश्यकता असते. प्रत्येक माणसाचे आंतरबाह्य दर्शन म्हणजे व्यक्तिमत्व .व्यक्तीचे विचार आणि त्याचा आविष्कार त्याची अभिरुची (Interest ), अभिवृती (Aptitude ) तसेच त्याची काम करण्याची पद्धती आणि जीवनविषयक तत्वज्ञान म्हणजे व्यक्तिमत्व होय. विचार करणे डोळयासमोर नसलेल्या कोणत्याही गोष्टीविषयी चालू असलेल्या मानसिक प्रक्रियेला(Thought Process) 'विचार' आपण म्हणतो . सकारात्मक बदल व्यक्तिमत्व विकासामुळे घडून येतात . तसेच रूप , स्वभाव , वर्तणूक , दृष्टिकोन ,चारित्र्य , बुद्धिमता , कौशल्ये, भाव-भावना ,संवेदनशीलता, लोकसंग्रह, गुण-अवगुण व समायोजन या सर्व बाबी विचारात घेऊन सर्वांगीण विकास कसा करावा यासंदर्भात मार्गदर्शन केले.सफल व्यक्तिमत्त्वासाठी वेळेचे नियोजन,प्रसन्नते चे महत्त्व,आत्मविश्वास आणि वाचन संस्कृती जोपासण्याची कशी गरज आहे, ते उदाहरणासह समजावून सांगितले.प्रसिध्द विचारवंत बेकन,तत्त्वज्ञ सेरे,विन्स्टन चर्चिल,महात्मा गांधी,लोकमान्य टिळक व संत कवींचे विचार ( Role of saints and poets) हे ओघवत्या शैलीत मांडले.छ.शिवराय स्व रचीत पोवाडा पेश करण्यात आला. क्लबचे सचिव श्री.आत्माराम घाणेकर, श्री.दीपक वझे(अध्यक्ष, आंतरराष्ट्रीय चेस स्पर्धा)श्री लिआन अँथनी आणि मान्यवर यावेळी उपस्थित होते.शेवटी आभाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

# शिवभोजन थाळी बंद होण्याच्या मार्गावर ?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

मुंबई : कोरोना काळात लाखो कामगारांना आधार ठरलेली शिवभोजन योजना संकटात सापडली आहे. केंद्र चालकांना वेळेत अनुदान मिळत नसल्याने जिल्ह्यातील शिवभोजन केंद्र चालकांनी स्वतः केंद्र बंद करावीत, असे विनंती अर्ज करून या योजनेतून काढता पाय घेतला. रायगड जिल्ह्यात आतापर्यंत ४९ केंद्र बंद झाली आहेत. आजच्या घडीला ७२ केंद्र कागदोपत्री सुरू असली तरी यातील ५० टक्के बंद होण्याच्या मार्गावर आहेत. लाडकी बहीण योजना बंद होणार नसून, त्यात वाढ करण्यात येणार असल्याचे सरकारकडून जाहीर करण्यात आले. सध्या कोट्यवधी लाडक्या चहिणींना निधी देण्यासाठी राज्य सरकारला महिन्याला ४ हजार कोटी खर्च करावे लागतात, त्यामुळे इतर योजनांना निधी देण्यात आखडता हात घेतला जात आहे. यात शिवभोजन केंद्रांना सर्वात जास्त फटका बसत आहे. राज्यातील गरीब आणि कष्टकरी लोकांना पोटभर आणि चांगले जेवण मिळावे, यास्वती २०२० साली उद्धव ठाकरे यांच्या सरकारने शिवभोजन चाळी सुरु केलीय. १० रुपयांत गरीबांना पोटभर जेवण मिळावे, यासाठी शिवभोजन थाळी योजना सुरू करण्यात आली. याचा सर्वात जास्त फायदा कोरोना कालावधीत झाला. लॉकडाऊनमध्ये सर्व काही बंद असताना गोरगरीब कष्टकरी जनतेकडून शिवभोजन केंद्रातील जेवणासाठी मागणी वाढत होती. त्यामुळे तत्कालीन सरकारने जिल्ह्यात ३०० हुन अधिक शिवभोजन केंद्र सुरू केली होती. यातील जेमतेम ७२ केंद्र सुरू असून तीदेखील टप्प्याटप्प्याने बंद पडत चालली आहेत,

महिला बचत गटांना प्राधान्य शिवभोजन थाळी केंद्र चालवण्यास देताना महिला बचत गटांचा प्राधान्याने विचार करण्यात आला होता. अनेक महिला बचत गट ही केंद्रे उत्तम चालवत होते. त्याद्वारे या महिला बचत गटांतील सदस्यांना रोजगार व आर्थिक स्थैर्यही मिळत होते. राज्य सरकारकडून शिवभोजन थाळी केंद्र चालकांना प्रत्येक थाळीमागे दर महिन्याला अनुदान देण्यात येत होते; मात्र आता हे अनुदान देण्यात विलंब लागत आहे, असे केंद्र चालकांचे म्हणणे आहे.

> शिवभोजन योजनेतून जिल्ह्याक स्वता दरदिवसासाठी ८ हजार ७५० मंजूर आहेत. १० रुपयांत जेवण देण्याची ही योजना होती. शहरी भागासाठी शासनाकडून ४० रुपये, तर २५ रुपये ग्रामीण भागातील केंद्राना सरकारकडून अनुदान दिला जात होता. सध्याच्या स्थितीत निधी उपलब्ध होत नसल्याने हे अनुदान देण्यात अडचणी येत आहेत.
> - सर्जेराव सोनावणे, जिल्हा पुरवठा अधिकारी

राज्यात अनेक ठिकाणी शिवभोजन थाळी केंद्रे सुरू करण्यात आली. त्यास गरीब जनतेचा चांगला प्रतिसाद मिळत होता. जनतेचा प्रतिसाद पाहून राज्य सरकार टप्याटप्याने शिवभोजन थाळी केंद्रांच्या संख्येत वाढ केली; मात्र ही केंद्र टप्याटप्याने बंद पडत चालली आहेत. आजच्या घडीला सर्वात ७ केंद्रे महाड तालुक्यात सुरू आहेत. अनेक कारणांमुळे १० रुपयात जेवण देणे परवडत नसल्याने केंद्र चालकही अडचणीत सापडले आहेत.अनेक केंद्रांवरील शिवभोजनाचे बॅनरदेखील हटवण्यात आल्याने गरजुंना ही केंद्र शोधूनही सापडत नाहीत, अशी परिस्थिती रायगड जिल्ह्यात निर्माण झाली आहे.

## रेसिपी
### चवदार मटार कचोरी



**साहित्य**

-एक कप सोललेला मटार -एक कप रवा -एक चमचा चिली फ्लेक्स -हींग -चवीनुसार मीठ -एक चमचा तूप -दोन कप पाणी -बारीक कापलेला कांदा -एक चमचा धणे -एक चमचा बडीशेप -एक चमचा जीरे -हळद -आमचूर पावडर -अर्धा कप बूंदी

**कचोरी बनवण्याची कृती**

-सर्वप्रथम मटार सोलून घ्या. तो स्वच्छ पाण्यात धुवा आणि पॅनमध्ये पाणी घालून उकडून घ्या -मटार शिजल्यानंतर गॅस बंद करा. मटारमधील पाणी काढून टाका आणि थंड होण्यासाठी ठेवा -दुसऱ्या पॅनमध्ये दोन कप पाणी टाका. त्यामध्ये एक चमचा तूप, चिली फ्लेक्स, मीठ आणि रवा टाका. रवा सर्व पाणी शोषून घेणार. त्यानंतर गॅस बंद करा आणि तयार झालेल्या रव्याचे मिश्रण थंड करण्यासाठी एका ताटात ठेवा. -मिश्रण थंड झाल्यानंतर चांगले मळून घ्या. -पॅनमध्ये तेल गरम करा आणि त्यात जीर, बडीशेप, धणे बारीक करून टाका. त्यानंतर बारीक कापलेला कांदा टाका. -कांदा चांगला तळल्यानंतर त्यामध्ये मटार घाला. सोबत हळद, लाल मिरची पावडर, मिठ, आमचूर पावडर आणि गरम मसाले घाला. -शेवटी बूंदी क्रश करून टाका. मॅशरने मटार क्रश करून घ्या. -मळून ठेवलेले पिठ हातात घ्या. त्यामध्ये तयार झालेले मटारचे मिश्रण भरून गोल करा. -अप्पे पात्राला तेल लावून घ्या. त्यामध्ये तयार झालेल्या कचोरी ठेवा. -अप्पे पात्रावर झाकण ठेवून कचोरी शिजवून घ्या.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | |
|---|---|
| १ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ सिक्युरिटी अँण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# मालमत्ता थकबाकीदारांसाठी उल्हासनगर मनपाची अभय योजना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** : उल्हासनगर महापालिकेच्या थकीत मालमत्ता कराच्या थकबाकीचा डोंगर दिवसेंदिवस वाढत असून त्यामुळे विकास कामांवर परिणाम होतो आहे. त्यामुळे मालमत्ता कराची थकबाकी वसूल करण्यासाठी उल्हासनगर पालिका प्रशासनाने २४ फेब्रुवारीपासून १८ मार्च पर्यंत तीन टप्प्यात अभय योजना लागू केली आहे.

ही अभय योजना अंतिम असल्याचे सांगितले जाते आहे. पहिल्या टप्प्यात २४ फेब्रुवारी ते ६ मार्चपर्यंत संपूर्ण थकबाकीसह चालू कराची रक्कम एकरकमी भरल्यास १०० टक्के विलंब शास्ती माफ केली जाणार आहे. त्यानंतर विलंबशास्तीत ७५ टक्के तर शेवटच्या टप्प्यात ५० टक्के माफी दिली जाणार आहे.




उल्हासनगर महापालिकेची आर्थिक स्थिती गेल्या काही वर्षात भीषण झाली आहे. मालमत्ता कराची वसुली होत नसल्याने थकबाकी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. अनेक वर्षे पालिकेची थकबाकी आणि पालिकेचा अर्थसंकल्प यात थकबाकी वरचढ दिसत होती. लोकप्रतिनिधींनी अनेकांना दिलेले संरक्षण, थकबाकीदारांवर होत नसलेली ठोस कारवाई आणि रखडलेल्या मालमत्ता प्रकरणांचा निपटारा होत नसल्याने थकबाकी वाढतीच आहे. त्यावर अनेकदा लोकप्रतिनिधींकडून अभय योजनेचा उतारा सूचवला जातो. त्यामुळे गेल्या दशकभरात दहावेळा अभय योजना लागू करण्याची वेळ पालिका प्रशासनावर आली आहे. २०२१ पर्यंत पालिका प्रशासनाने सहा वेळा अभय योजना लागू केली होती. त्यानंतर २०२२ मध्ये सातव्यांदा

अभय योजना लागू करण्यात आली. तर आयुक्त अजीज शेख यांनी २०२३ मध्ये दोनदा अभय योजना लागू केली होती. तर २०२४ मध्येही एकदा अभय योजना लागू करण्यात आली होती. तर आता नव्याने आयुक्तपदी विराजमान झालेल्या मनिषा आव्हाळे यांनीही अभय योजना लागू केली आहे. यंदा तीन टप्प्यांमध्ये ही अभय योजना राबवली जाणार आहे. २४ फेब्रुवारी ते १८ मार्च या दरम्यान नागरिकांना या अभय योजनेचा लाभ घेता येणार आहे.

उल्हासनगर शहरात १ लाख ८३ हजार करपात्र मालमत्ता आहेत. मालमत्ता कर थकबाकीदारांना तीन टप्प्यात वेगवेगळे लाभ मिळणार आहेत. पालिका प्रशासनाने ही अंतिम अभय योजना असल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे या योजनेत किती करभरणा होतो आणि अभय योजनेला थकबाकीदार कसा प्रतिसाद देतात हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## अशी आहे योजना

**टप्पा पहिला – दिनांक २४ फेब्रुवारी, २०२५ ते दिनांक ०६ मार्च, २०२५ –थकबाकीसह चालु कराची संपूर्ण रक्कम एकरकमी भरणा केल्यास १०० टक्के विलंब शास्ती माफ केली जाईल.**

**टप्पा दुसरा – दिनांक ०७ ते १२ मार्च, २०२५ दरम्यान थकबाकीसह चालु कराची संपुर्ण रक्कम आणि २५ टक्के शास्तीची रक्कम एकरकमी भरणा केल्यास ७५ टक्के विलंब शास्ती माफ केली जाईल.**

**टप्पा तिसरा – दिनांक १३ ते १८ मार्च, २०२५ दरम्यान थकबाकीसह चालू कराची संपूर्ण रक्कम आणि ५० टक्के शास्तीची रक्कम एकरकमी भरणा केल्यास ५० टक्के विलंब शास्ती माफ केली जाईल.**

# मुंबई मेट्रो तीन मार्च अखेर धावणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबईकरांना मार्च अखेर आणखी एक मेट्रोचं गिफ्ट मिळू शकतं. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (MMRC) कुलाबा-वांद्रे-सीप्झ भूमिगत मेट्रो 3 प्रकल्पाच्या बीकेसी – कुलाबा पर्यंतचं ९३.१ टक्के काम पूर्ण झालं आहे. मार्च 2025 अखेर प्रवासी सेवेसाठी हा मेट्रो मार्ग सुरू करण्याचं लक्ष्य आहे. विधानसभेतील विजयानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मेट्रो प्रकल्पाचा आढावा घेतला होता. महायुती सरकारच्या 100 दिवसांच्या अजेंड्यामध्ये या विस्ताराचा समावेश करण्यात आला होता.

मुंबई मेट्रोच्या या महत्त्वाच्या टप्प्यात बीकेसी-आचार्य अत्रे चौक आणि वरळी स्थानकांचं बांधकाम वेगाने सुरू आहे. त्यामुळे लवकरच मेट्रो सेवा सुरू होण्याची शक्यता आहे. 'फेज 2A' च्या बांधकामासोबतच त्याची रचना आणि पद्धतशीर कार्ये देखील अंतिम केली जात आहेत. सुरक्षा प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार आहेत. त्यानंतर हा टप्पा वाहतूक सेवेत आणण्यासाठी आवश्यक असलेली अंतिम मंजुरी मिळेल. या टप्प्याचे कामकाज सुरू झाल्यानंतर मुंबईच्या वाहतूक कोंडीला दिलासा मिळू शकेल, अशी माहिती MMRC च्या अधिकाऱ्यांनी




दिली. मुंबई मेट्रो मार्गाची म्हणजे एक्वालाइनची एकूण लांबी 33.5 किलोमीटर असून या मार्गावर एकूण 27 स्थानके आहेत. हे कॅफे परेड BKC आणि आरे JVLR ला जोडते. 12.69 किमी लांबीच्या या टप्प्याचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या वर्षी ऑक्टोबर 2024 मध्ये फेज-1 मध्ये केले होते. या मार्गाचा आणखी एक भाग मार्चमध्ये सुरू होणार आहे. हा मार्ग बीकेसी ते आचार्य अत्रे चौकापर्यंत आहे. आचार्य अत्रे चौकापर्यंत मेट्रो गेल्याने बीकेसी ते वरळी दरम्यान मेट्रोची जोडणी होणार आहे.

मुंबईच्या वाहतूक या पायाभूत सुविधांचा कायापालट करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (MMRDA) ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भूमिगत भुयारी मार्गासाठी यशस्वीरित्या आर्थिक नियोजन केले आहे. ज्यामध्ये युनियन बँक ऑफ इंडियाच्या लार्ज कॉर्पोरेट शाखा, मुंबई यांनी ७३२६ कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केले आहे. हे एमएमआरडीएची मजबूत आर्थिक विश्वासार्हता तसेच जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा पुरवण्याच्या वचनबद्धतेची प्रचिती देते. ६.२३ किमी लांबीच्या या बोगद्यासाठी एका महाकाय टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) चा वापर केला जाईल. बोगद्याचा व्यास ११ मीटर असेल. हा बोगदा जमिनीच्या पृष्ठभागापासून सुमारे १५ ते २० मीटर खाली असेल. अशा परिस्थितीत, बोगदा खोदण्याचे काम जमिनीखालून सुरू होईल. टीबीएम लाँचिंग शाफ्टद्वारे जमिनीत खाली आणले जाते

# वर्सोवा पुलावर वाहने थांबविण्यास बंदी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई**: मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर तयार करण्यात आलेल्या नवीन वर्सोवा पुलावर वाहने उभी केली जात असल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला होता. अखेर त्या ठिकाणी वाहने उभी करण्यास बंदी घातली असून तशी अधिसूचना वाहतूक विभागाने जारी केली आहे. वसई पूर्वेच्या भागातून मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. या महामार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असते. जुना वर्सोवा पूल धोकादायक बनल्याने महामार्ग प्राधिकरणाने नवीन वर्सोवा पूल तयार केला आहे. नवीन वर्सोवा वाहतुकीला खुला झाल्यानंतर वर्सोवा पुलाजवळच्या परिसरात होणारी वाहतूक कोंडी ही कमी झाली आहे. मात्र तयार करण्यात आलेल्या नवीन पुलाच्या दोन्ही मार्गिकेवर अवजड वाहने उभी केली जात आहेत. तर दुसरीकडे काही अतिहौशी नागरिक ही वाहने मध्येच थांबवून सेल्फी काढणे, छायाचित्रण करणे असे प्रकार समोर येत आहे. अखेर नवीन वर्सोवा पुलावर वाहने थांबविण्यास बंदी घातली आहे.

# पनवेल महापालिका कर्मचाऱ्यांचे उपोषण स्थगित




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल** : पनवेल महापालिका कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी मंगळवारपासून पालिका मुख्यालयासमोर बेमुदत उपोषण होणार होते. परंतु सोमवारी पनवेल महापालिका आयुक्तांनी कामगार संघटनेच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेऊन यशस्वी चर्चा केल्यामुळे तूर्तास आंदोलनाचे हत्यार कामगारांनी म्यान केले आहे.

पनवेल महानगरपालिकेत म्युनिसिपल एम्प्लॉइज युनियनचे ४५० सभासद आहेत. यामध्ये पूर्वाश्रमीच्या ग्रामपंचायतीमधील पालिकेत समावेश झालेल्या कामगारांचासुद्धा समावेश आहे. पूर्वीच्या महापालिकेचे आणि ग्रामपंचायतीचे कामगार या दोन्ही घटकांसाठी हे आंदोलन पुकारण्यात आले होते.

सोमवारी पालिकेच्या सभागृहात पालिका कर्मचाऱ्यांची बैठक झाली. पेशन योजना, वारस व अंनुकपाची प्रकरणे, सेवा जेष्ठतेप्रमाणे यादी नव्याने तयार करुन पदोन्नती देण्याबाबत, पालिका कामगार गणवेश वाटप व पावसाळी प्रावरणे वेळेत देण्याबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली.

तसेच पालिका कामगार कर्मचारी व अधिकारी यांना सेवानिवृत्तीधारक यांना दहा लाख रूपयांची कॅशलेश मेडिकल पॉलिसी लागू करणेबाबत निर्णय या बैठकी घेण्यात आला. तसेच पूर्वाश्रमीचे ग्रामपंचायतीच्या कामगारांचे समावेशन महानगरपालिका निर्मिती म्हणजे १ ऑक्टोबर २०१६ पासून धरण्यात यावा, याच कालावधीपासून संबंधित कामगारांना सेवा सुविधा देण्याबाबत पालिकेने सकारात्मक भूमिका घ्यावी असेही कामगार प्रतिनिधींनी मागणी केली.

पालिका आयुक्त मंगेश चितळे आणि पालिकेचे अतिरीक्त आयुक्त कैलास गावडे यांनी या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला.

# ठाणे रायगड जिल्ह्यातील स्थानिक मच्छिमारांचा व्यवसाय धोक्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण** : हवामानातील सातत्याने होणारे बदल, समुद्रातील वाढता मानवी हस्तक्षेप आणि जलप्रदूषणामुळे दिवसेंदिवस माशांचा साठा कमी होत चालला आहे. कधीकाळी राज्याच्या सागरी जलाधिक्षेत्रात मुबलक मत्स्यसंपदा होती. पण तिच्यावर उपजीविका करणारे लाखो मच्छीमार मागील काही वर्षांपासून मासळीच्या दुष्काळाशी झुंजत लागत आहेत. त्यामुळे मासळीच्या किरकोळ दरातही ३० टक्क्यांची वाढ झाल्याने खवय्यांच्या खिशालाही चाट बसत आहे. अरबी समुद्र तसेच बंगालच्या उपसागरातील काही भागांमध्ये झिरो ऑक्सिजन झोन निर्माण झाले आहेत. त्यामुळे अशा भागांतून काही प्रजातींचे मासे इतरत्र स्थलांतरित होत आहेत. घोळ,जिताडा, शेवंड, बोंबील, मांदेली, कर्ली, कोळंबी, पापलेट, सुरमई तसेच खेकडे याचबरोबर इतर अनेक प्रजातींचे समुद्रातील अस्तित्व मागील काही वर्षांपासून कमी झाले आहे. बेकायदा पर्ससीन, एलईडी मासेमारीचा होणारा अतिरेक याचा मोठा परिणाम पारंपरिक मच्छीमारांच्या आर्थिक उत्पन्नावर झाला असल्याचे मच्छीमारांकडून सांगितले जात आहे. तसेच राज्याच्या सागरी हद्दीत घुसखोरी करून कोट्यवधींची मत्स्य संपदा हडप करणाऱ्या कर्नाटक, गुजरात राज्यांतील हायस्पीड ट्रॉलर्सनींही राज्यातील पारंपरिक मच्छीमारांचे जगणे कठीण करून टाकले आहे. समुद्रातील वाढते जलप्रदूषण, अनियंत्रित परराज्यांतील यांत्रिक तसेच यंत्रचलित मासेमारी नौकांवर प्रतिबंध घालाण्याची व अवैध पर्ससीन, एलईडी मासेमारीवरील बंदी केवळ कागदावरच राहिली आहे. मासळीची घटती उत्पादकता आणि नौकांची कमी होणारी संख्या यामुळे मासेमारी व्यवसायावर गंडांतर आले असल्याचे मच्छीमारांचे म्हणणे आहे. सागरी मासेमारीला तर मुळातच अनेक मर्यादा आहेत. त्यातच समुद्रातील वाढत्या प्रदूषणामुळे अनेक प्रजातींचे मासे मोठ्या प्रमाणावर मृत्युमुखी पडत आहेत तर काही प्रजाती स्थलांतर करीत आहेत. जागतिक तापमान वाढीमुळेही माशांसह समुद्रातील एकंदरीतच जीवसृष्टीवरच अनिष्ट परिणाम होत आहे.



# इंडियन मेडिकल असोसिएशनमध्ये आयकर विभागाची कार्यशाळा

## आयकर कायदे व तरतुदींवर सविस्तर चर्चा





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण येथील इंडियन मेडिकल असोसिएशन मध्ये शुक्रवार दिनांक 14 फेब्रुवारी 2025 रोजी आयकर विभागातर्फे ट्रस्ट आणि धर्मदाय संस्थांशी संबंधित आयकर कायद्यातील सूट तरतुदी आणि अलीकडील सुधारणा या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी कार्यशाळेचे प्रमुख अतिथी आयकर अधिकारी श्री मनीष कुमार गुप्ता आयकर निरीक्षक अभिलाष शाक्य तसेच कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी डॉक्टर सुरेखा ईटकर,डॉक्टर चिटणीस सर्व डॉक्टर्स आणि सनदी लेखापाल श्री दीपक दर्जी व श्री प्रशांत कदम उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी श्री मनीष कुमार गुप्ता सर यांनी कार्यशाळेबद्दल संक्षिप्त स्वरूपात प्रस्ताविक दिले संपूर्ण सत्रात ट्रस्ट आणि धर्मदाय संस्थांशी संबंधित विविध प्रकारच्या आयकर सूटबद्दल विस्तृत तसेच आयकर कायद्यातील आयकर विभागाकडून देण्यात येणारी सूट, विविध तरतुदी आणि अलीकडील आयकर कायद्यामध्ये झालेली सुधारणा याविषयी अतिशय उपयुक्त अशी माहिती त्यांनी आपल्या भाषणातून सादर केली. ही कार्यशाळा संयुक्त आयकर आयुक्त (सूट) पुणे श्री. मनीष मेहता सर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तथा आभार प्रदर्शन डॉ. चिटणीस मॅडम यांनी केले

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त भिवंडीत 'जय शिवाजी जय भारत' पदयात्रा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : दि.१९ फ़ेब्रुवारी २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त भिवंडी महापालिका प्रशासनाच्या वतीने शहरात "जय शिवाजी जय भारत" पदयात्रेचे आयोजन करण्यात आलेले होते. छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त दि. १९ फेब्रुवारी, २०२५ रोजी महानगरपालिका मुख्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से) यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम सकाळी. ७.०० वा पार पडला. तनंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आश्वारुढ पुतळयास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यानंतर चाचा नेहरु विद्यालयाच्या प्रांगणात सर्व उपस्थित जनसमुदायाला मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से) यांनी संबोधीत केले. केंद्र शासनाच्या युवा कार्यक्रम मंत्रालयाच्या निर्देशानुसार "जय शिवाजी जय भारत" पदयात्रा सकाळी. ०७.३० वाजता चाचा नेहरु हायस्कूल, भिवंडी येथुन सुरु करुन पुनःश्च त्याच ठिकाणी पदयात्रेचा समारोप करण्यात आला. या पदयात्रेमध्ये अंदाजे ३५०० ते ४००० विद्यार्थी, शिक्षक, महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी, नागरिक यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला.

पदयात्रेच्या समारोपा नंतर कु. संस्कृती सदानंद म्हात्रे या शालेय विद्यार्थीनीने छपत्रती शिवाजी महाराजांच्या जीवनावर अतिशय प्रभावी असे भाषण केले. त्यानंतर भिवंडी शहरातील राष्ट्रीय व राज्य पातळीवरील पुरस्कार प्राप्त खेळाडूंचा सत्कार मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से) यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमप्रसंगी अतिरिक्त आयुक्त देविदार पवार, विठ्ठल डाके, शहर अभियंता श्री. जमील पटेल, उपायुक्त रोहिदास दोरकुळकर, श्री. बाळकृष्ण क्षिरसागर, शैलेश दोंदे, प्रणाली घोंगे डॉ. अनुराधा बाबर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. संदिप गाडेकर, सहा. पोलीस आयुक्त (पुर्व) श्री. सचिन सांगळे, सहा. पोलीस आयुक्त (पश्चिम) श्री. दिपक देशमुख, महानगरपालिकेचे सर्व सहाय्यक आयुक्त, विभाग प्रमुख, कर्मचारी, शालेय विद्यार्थी, शिक्षक, आशा वर्कर, एन.सी.सी/ ए न . ए स . ए स / स्क ाऊ ड गाईड/आर.एस.पी चे विद्यार्थी, खेळाडू आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिडकोचे घर ; नको रे बाबा !

## सोडत जाहीर होण्यापूर्वीच ग्राहकांची माघार



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : सिडको महामंडळाने चार महिन्यांपूर्वी २६ हजार घरांच्या सोडत प्रक्रियेला सुरूवात केली. मात्र अजूनही सोडत प्रक्रिया पूर्ण झाली नाही. सिडकोच्या घरांच्या किमती महाग असल्याने अनेक अर्जदारांनी सिडकोची सोडत जाहीर होण्यापूर्वीच सिडकोला ई-मेलद्वारे ते माघार घेत असल्याचे कळविले आहे. संबंधित महाग घरांचे सिडको मंडळाला पाठविलेले संदेश अर्जदारांनी ह्यलोकसत्ताह्ला सुद्धा पाठविले आहेत. याविषयी सिडकोच्या जनसंपर्क विभाग आणि काही उच्चपदस्थ अधिकाऱ्यांकडे संपर्क साधला मात्र अधिकारी वर्गाने प्रतिसाद दिला नाही. सोडतीला वारंवार मुदतवाढ देऊन अखेर सिडकोने बुधवारी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या दिवशी सोडत प्रक्रिया होणार असल्याचे जाहीर केल्याने २१ हजार अर्जदारांचे लक्ष सोडतीकडे लागले आहे.

सिडकोने १२ ऑक्टोबरला 'माझे पसंतीचे माझे घर' या २६ हजार घरांच्या सोडत प्रक्रियेला सुरूवात केली. यावेळी पहिल्यांदाच सिडको मंडळाने घर विक्रीसाठी ७०० कोटी रुपये देऊन कंत्राटदार नेमला आहे. या कंत्राटदाराला घरविक्रीपूर्वी आणि निवडणूक काळापूर्वीच १०४ कोटी सिडकोने दिले. या कंत्राटदाराने सिडकोची २६ हजार घरांच्या विक्रीसाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे होते. मात्र तसे होताना दिसले नाही.

सिडकोने घर विक्रीसाठी नवीन कंत्राटदार नेमला त्याचसोबत या सोडतीमध्ये अटीशर्तीमध्ये सुद्धा बदल केला. अर्जदारांना घरांच्या किमती उशीराने कळवल्या. तसेच किमती जाहीर करण्यापूर्वीच अर्जदारांकडून त्यांची कागदपत्रे जमा करुन घेतली. यामध्ये अर्जदाराची संपूर्ण माहिती तसेच अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र व इतर पुरावे अशा कागदपत्रांचा समावेश होता. ही कागदपत्रे जमा करताना अनेकांना हजारोंची पदरमोड आणि वेळ घालवावा लागला. त्यामुळे या सोडतीला सुरुवातीलाच प्रतिसाद कमी मिळला.

**सिडको महामंडळाने ना नफा, ना तोटा या तत्वांवर चांगल्या बांधकाम दर्जाची घरे बांधली आहेत. कोणतेही छुपे दर यामध्ये अर्जदारांकडून घेतले नाहीत. इमारतीच्या महागृहनिर्माणातील परिसर प्रशस्त आहे. त्यामध्ये सुविधा सुद्धा उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्यामुळेच २१ हजार ४०० अर्जदारांनी 'माझे पसंतीचे माझे घर' या योजनेला पसंती दर्शवून सिडकोच्या सोडतीला पोचपावती दिली आहे. या घरांचे बाजारभावापेक्षा कमी दर असल्याने त्याला महाग घरे म्हणता येणार नाही. विजय सिंघल, व्यवस्थापकीय संचालक, सिडको मंडळ**

२६ हजार घरांसाठी सोडत प्रक्रियेमध्ये १ लाख ६० हजार अर्जदारांनी नाव नोंदणी केली. अर्जनोंदणीसाठी अडीचशे रुपये अर्जदारांना भरायचे होते. मात्र सिडकोने घरांच्या किमती जाहीर केल्यावर १ साख ६० हजार पैकी एक लाख अर्जदारांनी अर्जशुल्क न भरता पहिल्यांदा सोडत प्रक्रियेतून माघार घेतली. आणि उर्वरीत ६० हजार अर्जदारांनी अडीचशे रुपये सिडकोकडे जमा केले. तळोजातील घरांची किमत २५ लाख तर खारघरचे घर एक कोटी सात लाख आणि आणि वाशी येथील घर ७९ लाख रुपयांना असल्याने अर्जदारांचा हिरमोड झाला. त्यामुळे ६० हजार पैकी ३८ हजार ६५० जणांनी पुन्हा सोडत प्रक्रियेतून माघार घेण्याचे पाऊल उचलले. अनामत न भरता या प्रक्रियेतून हे अर्जदार बाहेर पडले. त्यामुळे शेवटच्या टप्यात २१ हजार ३५० अर्जदार या सोडत प्रक्रियेमध्ये उरले. मात्र १५ फेब्रुवारीला होणाऱ्या सोडतीचा मुहूर्त पुढे ढकल्याने पुन्हा अर्जदारांनी सिडकोच्या कारभाराविषयी संताप व्यक्त केला. या दरम्यान अनामत रक्कम भरलेल्या अनेक अर्जदारांनी सिडको मंडळाकडे लेखी इ मेलवरुन संपर्क साधून या सोडत प्रक्रियेतून माघार घेतली. आतापर्यंत किती अर्जदारांनी माघार घेतली याविषयी सिडकोच्या जनसंपर्क विभागाकडे तसेच पणन विभागाकडे संपर्क साधला मात्र संपर्क होऊ शकला नाही.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

# कमाल खानच्या वादग्रस्त वक्तव्याचा शंभुदुर्ग प्रतिष्ठानकडून निषेध

## खडवली बाजार पेठेत मोर्चा काढत पोलिसांना दिले निवेदन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / कल्याण : कमाल खान याने संभाजी राजां बाबत विकिपिडियावर एक वादग्रस्त व आक्षेपार्ह पोस्ट केली होती. यामुळं संपूर्ण देशात याचे पडसाद उमटले. त्या नंतर प्रशासनं ठोस पावलं उचलत विकिपीडिया कडून सदरची पोस्ट हटविण्यात आली, मात्र त्यानंतरही कमाल खान याने ट्विटर वर हि पोस्ट योग्य असल्याचे पुन्हा वादग्रस्त विधान केलं. या वादग्रस्त केलेल्या वक्तव्याचा खडवली येथे शंभु दुर्ग प्रतिष्ठान व शिव प्रेमींनी खडवली बाजारपेठेतुन निषेध मोर्चा काढत कमाल खानच्या वक्तव्याचा निषेध केला. यावेळी पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आलं. अशा प्रकारच महापुरुषांच्या बाबत वादग्रस्त व आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या कमाल खानवर ठोस कारवाई करण्याची मागणी प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आली आहे.




## संक्षिप्त

# नारिवली गावात शिव मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : नारीवली गावचे (उपसरपंच) राम भोईर आणि त्यांचे बंधू अनंता भोईर,( शिवसेना विभाग प्रमुख) यांनी स्वर्गीय महादू भिका भोईर आणि स्वर्गीय धानुबाई महादू भोईर या मातापित्यांच्या स्मरणार्थ नारीवली गावात शिवशंकर शंभू महादेवाचे मंदिर बांधले आहे या मंदिराचे प्राणप्रतिष्ठा दिनांक 15 2 25 ते 18 2 25 दरम्यान आचार्य प्रल्हाद महाराज शास्त्री यांच्या शुभहस्ते करण्यात आली .

सकाळी नऊ ते चार वाजेपर्यंत श्री गणेश पूजन शोभायात्रा धान्य निवास, असे अनेक प्रकारचे धार्मिक विधी करून महादेवाचे पिंडीचे प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

तीन दिवस चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्यात अनेक नामांकित ह भ प. यांनी कीर्तन भजन मृदंग वादन असे अनेक सेवा महादेवाच्या मंदिरात त्याचा समर्पित केल्या आणि अनेक गावातील नागरिकांनी याचा लाभ घेतला. दरम्यान अनेक मान्यवरांनी महादेवाचे दर्शन घेतले यामध्ये माजी आमदार सुभाष भोईर अर्जुन भाई पाटील शिवसेना तालुकाप्रमुख किरण शेठ ठोंबरे उपसभापती रमेश पाटील जिल्हा परिषद सदस्य मोतीराम जोशी सरपंच भरत भोईर उप सभापतीं नगरसेवक हिरा पाटील अशा अनेक मान्यवरांनी आणि गावागावातून येणाऱ्या समस्त गावकऱ्यांनी शिवशंकर शंभू महादेवाचे दर्शन घेतले.

# उल्हासनगर महानगरपालिकेचा डिजिटल कारभार

## अंमलबजावणीत दिरंगाई दाखवणाऱ्या विभागांवर शिस्तभंगाची कठोर कारवाई केली जाईल- आयुक्तांचा इशारा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / उल्हासनगर : उल्हासनगर सरकारी कार्यालयांतील कागदपत्रांच्या ढिगाऱ्यात हरवणाऱ्या फाइलना, अनावश्यक दिरंगाई आणि अपारदर्शक कारभारावर अखेर पूर्णविराम देण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिका डिजिटल क्रांतीच्या दिशेने आगेकूच करत आहे. महापालिका प्रशासनाने आता ई-ऑफिस प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली असून, प्रत्येक विभागाला आपले प्रशासकीय काम डिजिटल पद्धतीने करण्याचे बंधनकारक आदेश देण्यात आले आहेत. महापालिका आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी या उपक्रमाला वेग देत १५ मार्च २०२५ पर्यंत महापालिकेच्या संपूर्ण कामकाजाचे १०० टक्के डिजिटलायझेशन करण्याचा सक्त आदेश दिला आहे. यासोबतच ई-ऑफिस प्रणालीच्या अंमलबजावणीत ढिलाई दाखवणाऱ्या विभागांवर शिस्तभंगाची कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील महानगरपालिकांना ई-ऑफिस प्रणाली लागू करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. मात्र महापालिकेतील अनेक विभाग जुन्या पद्धतीवर अडून बसल्याने आयुक्तांनी नाराजी व्यक्त केली आहे. महापालिके तील २१ विभागांनी ई-ऑफिस प्रणालीचा वापर सुरू केला असला तरी उर्वरित विभाग अजूनही कागदी नोंदीवरच अवलंबून आहेत. त्यामुळे १५ मार्चपर्यंत १०० टक्के ई-ऑफिस प्रणाली कार्यान्वित करावी, अन्यथा




शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट आदेश देण्यात आला आहे. महापालिका आयुक्त मनीषा आकाळे यांनी स्पष्ट केले आहे की, १५ मार्चपर्यंत सर्व विभागांनी आपले कामकान पूर्णपणे ई ऑफिस प्रणालीवर आणले पाहिजे, प्रत्येक विभागाने साप्ताहिक, पंधरवडा आणि मासिक अहवाल माहिती तंत्रज्ञान विभागाकडे सादर करणे बंधनकारक असेल. दररोज Google Sheet वर ई-ऑफिस कामकाजाचा अहवाल भरावा लागणार, त्यावर प्रशासनाचे नियमित निरीक्षण ठेवले जाणार आहे. आदेश न पाळणाऱ्या अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९ अंतर्गत कठोर कारवाई होईल, अशी स्पष्ट ताकीद देण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या कार्यपद्धतीत डिजिटल परिवर्तन होत असून, ई-ऑफिस प्रणालीमुळे नागरिकांना जलद, पारदर्शक आणि प्रभावी सेवा मिळणार आहे. त्यामुळे महापालिकेच्या प्रशासकीय प्रक्रियेत गती येऊन कामचुकार प्रवृत्तीवर आळा बसेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### ई-ऑफिस प्रणाली म्हणजे काय आणि ती कशी फायद्याची?

महापालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत राबविण्यात येणारी ई-ऑफिस प्रणाली ही प्रशासकीय कामकाजाच्या डिजिटल व्यवस्थापनाची आधुनिक प्रणाली आहे. यामुळे फाइल्स हाताळण्याची पारंपरिक पद्धत बंद होऊन संपूर्ण प्रक्रिया संगणकीकृत आणि गतिमान होईल.

### ई-ऑफिस प्रणालीचे प्रमुख फायदे ?

- कोणतीही फाइल आता दिवसानुदिवस टेबलवर पडून राहणार नाही
- किती दिवस प्रलंबित आहे याचा ट्रॅक ठेवता येईल. कोणतीही माहिती हरवणार नाही
- कोणत्या अधिकाऱ्याने दिलेल्या मुदतीत काम पूर्ण केले किवा नाही याची संपूर्ण माहिती मिळेल
- रहिवाशांच्या अर्ज व कामे त्वरित मार्गी लागतील

# सैनिकांच्या हस्ते शिवछत्रपतींचा दुग्धाभिषेक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : बुधवार, १९ फेब्रुवारी २०२५ रोजी म्हसा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा सालाबादप्रमाणे होत असलेला दुग्धाभिषेक सोहळा मुरबाड तालुक्यातील माजी सैनिक व कार्यरत सैनिक यांच्या हस्ते संपन्न झाला. शिवश्री. चेतनसिंह पवार यांच्या संकल्पनेतून दरवर्षी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते शिवछत्रपतींचा दुग्धाभिषेक सोहळा संपन्न होत असतो यावर्षी सदरचा मान शिवजयंती महोत्सव समिती, ठाणे जिल्हा यांच्यावतीने मुरबाड तालुक्यातील देश सेवेसाठी कार्यरत असणाऱ्या व निवृत्त झालेल्या सैनिकांना दिला. यावेळी सैन्य दलातील निवृत्त हवालदार जयवंत तुपे, निवृत्त नाईक गणेश कंटे, हवालदार समीर सय्यद, हवालदार मधुकर घुडे, हवालदार अमोल झुंजारराव, विद्यमान ब्लॅक कमांडो अशोक रगडे तसेच समितीचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह पवार, जयवंत पवार, संध्या कदम,



भारती पष्टे, नेताजी लाटे, गुरुनाथ देशमुख, वसंत कराळे, जयवंत हरड, कुरले सर, मगन घागस, रामचंद्र कुर्ले, संयोजक अरुण कुरले, नरेश कुर्ले, अनिकेत कुर्ले आदी उपस्थित होते. मागील दहा वर्षापासून समाजातील विविध वर्गाला दुग्धाभिषेक करण्याचा मान समितीच्या वतीने दिला जातो यावेळी मुरबाड तालुक्यातील देश सेवेसाठी कार्यरत असणारे मुरबाड तालुक्याचा मान सन्मान वाढवणाऱ्या सैन्य दलातील जवानांना दिल्याचे मत यावेळी प्रास्ताविकामध्ये चेतनसिंह पवार यांनी मांडले. मान्यवरांच्या वतीने श्री गणेश कंटे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे युद्ध कौशल्य, सैन्याची बांधणी, धर्मनरपेक्षतेचा विचार आदी मुद्दे यावेळी उपस्थित जनसमुदायासमोर ठेवले तसेच सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुर्ले व आभार प्रदर्शन अरुण कुर्ले यांनी केले.

## नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी
# शिक्षकांना सक्षमीकरणाचे धडे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे: राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 नुसार राज्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता विषयाची अंमलबजावणी सुरू आहे. त्यासाठी शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरावरील शिक्षकांचे सक्षमीकरण होणे आवश्यक आहे. त्यानुसार राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक सक्षमीकरण तालुकास्तरीय प्रशिक्षण दिनांक 11 फेब्रुवारी 2025 ते दिनांक 3 मार्च 2025 या कालावधीमध्ये ठाणे जिल्ह्यातील 06 महानगरपालिका व 05 तालुक्यातील 12 गटामध्ये सकाळी दहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत तीन टप्प्यात परिषदेच्या मार्फत आयोजित करण्यात आलेले आहे.

यामध्ये इयत्ता पहिली ते पाचवी, सहावी ते आठवी, नववी ते बारावी या इयत्तांना शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी आणि पर्यवेक्षकीय यंत्रणेसाठी हे प्रशिक्षण स्वतंत्र असणार आहे. या प्रशिक्षणामध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, राज्य अभ्यासक्रम आराखडा 2023, राज्य भ्यासक्रम आराखडा 2024, शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा, क्षमताधारीत मूल्यांकन संकल्पना व कार्यनीती, क्षमताधारित अध्ययन अध्यापन प्रक्रिया, क्षमताधारीत प्रश्न निर्मिती, उच्च विचार प्रवर्तक प्रश्न, अध्ययन निष्पत्ती नुसार प्रश्न निर्मिती समय प्रगती पत्रक संकल्पना व स्तरनिहाय स्वरूप या विषयावर या प्रशिक्षणामध्ये मार्गदर्शन व चर्चा केली जाणार आहे. दि 11 ते 15 फेब्रुवारी 2025 या कालावधीमध्ये सुमारे 8759 शिक्षकांनी 356 सुलभकांद्वारे प्रशिक्षण घेतले आहे. तसेच दिनांक 17 फेब्रुवारी 2025 ते 22 फेब्रुवारी 2025 या कालावधीमध्ये सुमारे 7069 शिक्षकांनी 280 सुलभकांद्वारे प्रशिक्षण घेत आहेत. या तिसऱ्या टप्प्यामध्ये सुमारे 3844 शिक्षक 158 सुलभकांद्वारे प्रशिक्षण घेणार आहेत. या तीनही टप्प्यात 19672 शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. उच्च माध्यमिक बोर्डाच्या परीक्षेचा चालू असल्यामुळे काही शिक्षक परीक्षा कामकाजामध्ये असल्यामुळे शिक्षकांची उपस्थिती नियोजित वेळापत्रकामुळे नसल्याने नियोजित 3 टप्पा ऐवजी 4 टप्प्यात 100% शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी यंत्रणा प्रयत्न करीत आहे

नवीन शैक्षणिक धोरणात भावी काळात निर्माण होणाऱ्या जागतिक आव्हानांना तोंड देण्यास सज्ज विद्यार्थी घडविण्यासाठी आवश्यक कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित करण्यासाठी अगोदर ती कौशल्ये शिक्षकामध्यें असणे आवश्यक आहे. अशी क्षमता युक्त शिक्षक घडण्यासाठी राज्य स्तरावर विद्या प्राधिकरण मार्फत व ठाणे जिल्ह्यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था राहाटोली जिल्हा ठाणे मार्फत इयत्ता 1ली ते 5 वी, 6 वी ते 8 वी व 9 वी ते 12 वी असे जवळपास 19000 शिक्षकांचे प्रशिक्षण सुलभक मार्फत पार पाडण्यात येत आहे. सदर प्रशिक्षण यशस्वी होण्यासाठी डायट ठाणे परिवार व जिल्हा शिक्षण प्रशासन यंत्रणा कार्यरत आहे.

- डॉ. संजय वाघ, प्राचार्य,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रहाटोली जि. ठाणे


# ६५ इमारतींमधील रहिवाशांच्या हितासाठी उद्धवसेना सरसावली



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महापालिका हद्दीतील ६५ बेकायदा बांधकामे तोडण्याचे आदेश उच्च न्यायालयाने पालिकेस दिले आहेत. या रहिवाशांची घरे तोडू देणार नाही. जे दोषी आहेत त्यांच्यावर आधी कारवाई करा अशी मागणी करीत रहिवाशांच्या बाजूने उद्धवसेना उभी ठाकली आहे. या प्रकरणी उद्धवसेनेने एसआयटी नेमली असल्याची माहिती जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी दिली. फसवणूक झालेल्या रहिवाशांची घरे उभारण्यासाठी आंदोलन करणार असल्याचा इशारा म्हात्रे यांनी दिला. डोंबिवलीचे शहरप्रमुख प्रकाश तेलगोटे यांच्या पुढाकारात ही एसआयटी नेमली. ही पक्षीय एसआयटी ६५ इमारतीत आणार आहे. त्या इमारतीची यादी, तेथे कोणत्या बिल्डरने काम केले, त्यासाठी कोणती कागदपत्रे सादर केली, रहिवाशांची यादी तयार करणार आहे. इमारतीत सगळी माहिती तयार करून त्याचे एक निवेदन तयार करून ते सरकारला सादर करणार आहे. घरे वाचविण्यासाठी आंदोलन उभे केले जाणार आहे. फसवणूक करणाऱ्यांची चौकशी करावी, त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करावे, त्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. रहिवाशांनी असा काही प्रकार घडत असल्यास उद्धवसेनेच्या एसआयटीशी संपर्क साधावा, असे आवाहन उद्धवसेनेने केले आहे. उद्धवसेनेच्या या भूमिकेस शिंदेसेनेचे माजी नगरसेवक विश्वनाथ राणे यांनी एक पोस्ट लिहून पाठिंबा दिला आहे.

रहिवाशांना घरे रिकामी करण्याच्या नोटिसा देणे सुरू केले आहे. घरे रिकामी करण्यासाठी पोलिस बळाचा वापर केला जाऊ शकतो. ज्याठिकाणी रहिवाशांना अशाप्रकारची जबरदस्ती केली जाईल त्याठिकाणी उद्धवसेनेचे पदाधिकारी पोहोचतील.



डोंबिवली शिवसेना शहर शाखेतर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त महाराजांना वंदन करताना शिवसैनिक

## शिवजयंतीनिमित्त बारा किमी अंतर पोहून
# मनस्वी मस्करेकडून शिवरायांना मानाचा मुजरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : डोंबिवलीतील मनस्वी संतोष मस्करे हिचा निर्धार आणि जिद्द थक्क करणारी आहे. ओमकार इंटरनॅशनल स्कूलमध्ये इयत्ता सातवीत शिकणारी मनस्वी जलतरण, कराटे आणि फुटबॉलमध्ये अतिशय उत्साही आहे. राज्यस्तरीय सागरी जलतरण स्पर्धा तसेच डी. एस. ओ. शालेय क्रीडा जलतरण स्पर्धेत तिने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विशेषतः समुद्रात पोहण्याची तिला प्रचंड आवड आहे.याच जिद्दीच्या जोरावर आणि शिवप्रेमाच्या प्रेरणेने, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त ती एलिफंटा बेट ते गेटवे ऑफ इंडिया हा १२ किलोमीटरचा जलतरण प्रवास पूर्ण करण्याचा संकल्प केला होता. छत्रपती शिवाजी महाराज हे पराक्रम, शौर्य आणि स्वाभिमानाचे ज्वलंत प्रतीक आहेत. त्यांच्या थोर गाथेला मानाचा त्रिवार मुजरा करण्याच्या भावनेने मनस्वीने हा धाडसी निर्णय घेतला.खडतर समुद्रयात्रा – जिद्द, मेहनत आणि शिवगर्जना१७ फेब्रुवारी



रोजी पहाटे ४:३० वाजता, अंगाला ग्रीस लावून, तिने एलिफंटा बेटावरून समुद्रात उडी घेतली. महाराष्ट्र राज्य हौशी जलतरण संघटनेचे निरीक्षक सुनील मयेकर यांच्या नेतृत्वाखाली तिचा हा प्रवास सुरू झाला. थंड वारे, समुद्रातील वाढते प्रदूषण, प्रचंड लाटा, मोठमोठ्या बोटी आणि जहाजांची ये-जा या सगळया अडथळयांमधून मनस्वीने आपल्या जिद्दीच्या बळावर मार्ग काढला. 'जय भवानी, जय शिवाजी' असा जयघोष करत ती प्रेरित होत राहिली.गेटवे ऑफ इंडिया येथे ऐतिहासिक जलमजरा अखेर अथक प्रयत्नांनंतर मनस्वीने गेटवे ऑफ इंडिया गाठले आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस मानाचा मुजरा केला. उपस्थित नागरिक, स्विमिंग कोच आणि मार्गदर्शकांनी तिच्या धाडसाचे कौतुक केले. तिच्या या अद्वितीय पराक्रमाने सर्वत्र तिचे अभिनंदन होत आहे. कठोर सराव आणि प्रशिक्षकांचे मार्गदर्शन मनस्वीने आपल्या या ऐतिहासिक प्रवासासाठी यश जिमखाना येथे प्रशिक्षक विलास माने आणि रवी नवले यांच्या मार्गदर्शनाखाली कठोर सराव केला.

# पालघर पोलिसांकडून सायबरचे धडे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : सध्याच्या डिजीटल युगात प्रत्येक व्यक्ती मोधाईल फोन, इंटरनेटचा वापर करत आहे. सायबर गुन्हेगार नागरीकांना वेगवेगळे आमिष दाखवणारे फोन कॉल करत असतात. काही नागरीक सायबर गुन्हेगारांच्या जाळयात अडकत आहेत. त्यामुळे सायबर गुन्हयाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे. पालघर जिल्हयातील नागरीक सायबर गुन्हेंगारना बळी पडू नये तसेच त्यांचेमध्ये सायबर साक्षरता निर्माण करण्यासाठी बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या संकल्पनेतुन जनसंवाद अभियान अंतर्गत 'सायबर सुरक्षीत पालघर' ही मोहिम राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री महोदय यांचे ७ कलमी कार्यक्रमाअंतर्गत सध्या पालघर जिल्ह्यात सायबर पोलीस ठाणे पालघर यांचेकडून "सायबर सुरक्षित पालघर" ही मोहिम राबविण्यात येत असून सदर मोहिम सर्व नागरिकांपर्यंत पोहोचने व जनजागृती होणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने दिनांक १८/०२/२०२५ रोजी जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे बाळासाहेच




पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांचे अध्यक्षतेखाली सायबर सुरक्षित पालघर मोहिमेअंतर्गत सायबर योध्दांना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यासाठी सोनोपंत दांडेकर कॉलेज, पालघर, चाफेकर कॉलेज, पालघर, आय.डि.एल. कॉलेज, पालघर, सी. एस. पी. कॉलेज, आशागड, थीम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, बोईसर, सेंट जॉन कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पालघर या महाविद्यालयातील एकूण ४०० विद्यार्थी तसेच महिला दक्षता समितीच्या एकूण ३३ महिला उपस्थित होत्या.सदर कार्यक्रमात सायबर योद्धा यांना सायबर गुन्हयांची ओळख, सायबर गुन्हे होण्याची पद्धती, सायबर गुन्हे घडल्यानंतर (गोल्डन अवर) पहिल्या एक तासात करावयाची कामगिरी, नॅशनल सायबर क्राईम पोर्टलवर तक्रारी कशी नोंदवावी, मोबाईल हरविल्यानंतर सी.ई. आय. आर. पोर्टलवर तक्रार कशी नोंदवावी, याबाबत माहीती देवून, सासबर सुरक्षित पालघर ही व्हिडीओची क्लीप दाखविण्यात आली तसेच सायबर गुन्हे घडल्यानंतर जनतेला कशी मदत करण्यात यावी याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. सदर कार्यक्रम हा बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्रीमती संगिता शिंदे अल्फान्सो, पोलीस उपअधीक्षक (गृह), पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक, श्रीमती भागीरथी पवार, पोलीस निरीक्षक अजय गोरड प्रभारी अधिकारी सायबर पोलीस ठाणे, पोलीस उप निरीक्षक, रुपाली गुंड, सायचर पोलीस ठाणे, मपोना/ कविता पाटील, मपोशि मोनिका तिडके, पोअं/रामदास दुर्गेष्ट, पोअं/ अक्षय शेट्ये, पोअं/रुपेश पाटील, पोअं/रोहित तोरस्कर सर्व नेमणुक सायबर पोलीस ठाणे, पालघर व इतर अंमलदार यांनी यशस्विरित्या पार पाडला.

# मराठा क्रांती सेवा संघातर्फे शिवजन्मोत्सव

## जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने दुमदुमला परिसर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे: छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 395 व्या जयंतीनिमित्त, मोठ्या उत्साहाने लोकमान्य नगर सावरकर नगर परिसरातील, सर्व मराठा बांधव व सर्व जाती-धर्माचे लोक मोठ्या प्रमाणामध्ये एकत्र येऊन, शिवजन्मोत्सवाचा कार्यक्रम साजरा करत असतात. याचे औचित्य साधून मराठा क्रांती सेवा संघ, लोकमान्य- वीर सावरकर नगर विभाग, ठाणे यांनी दि.19 फेब्रुवारी 2025 रोजी शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे मा.विरोधी पक्षनेते हनुमंत जगदाळे, माजी नगरसेवक एकनाथजी भोईर, दिलीपजी बारटक्के, कांचनताई चिंदरकर, अमित सरैय्या, विभाग प्रमुख राजीवजी शिरोडकर उपस्थित होते.

दि.18 फेब्रुवारी 2025 रोजी रात्री दुर्गाडी किल्ल्यावरून शिवज्योत परिसरात आणण्यात आली. दि.19 फेब्रुवारी 2025 रोजी सावरकर नगर, यशोधन नगर, लोकमान्य नगर येथून



ढोल ताशाचे गजरात शिवज्योत व पालखीची मिरवणुकीची सुरुवात करण्यात आली. यावेळा पारंपारिक पद्धतीचे नृत्य, भजनी मंडळी, महिला भजनी मंडळी, बैलगाडी, घोडे रथयात्रा अशा सांस्कृतिक वेशभूषा धारणकरून जय भवानी जय शिवाजी अशा घोषणांनी पूर्ण परिसर शिवमय झाला होता. विठ्ठल क्रीडा मंडळ, लोकमान्य नगर येथील शिवस्मारकाचे पूजन करण्यात आले. लोकमान्य नगर डेपो येथे मिरवणुकीचा शेवट चिमुकल्या पाखरांकडून शिवगर्जनेने करण्यात आला. यावेळी लोकमान्य नगर, सावरकर नगर परिसरातील सर्व मराठा बांधवांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024